# पुणे महानगरपालिका
## * स्थायी समिती *
## कार्यपत्रिका क्रमांक १३

स्थायी समितीची साप्ताहिक सभा **मंगळवार दि. २९/६/२०२१** रोजी सकाळी ११:०० (अकरा) वाजता **स्थायी समिती सभागृह, दुसरा मजला, पुणे महानगरपालिकेची नवीन विस्तारीत इमारत येथे दृक श्राव्य (व्हिडिओ कॉन्फरन्सिंग) द्वारे भरेल.**

सदर सभेत खालील विषयांचा विचार होईल.

**वृत्तांत कायम करणे.**

### मा.सभासदांचे प्रस्ताव

विषय क्र. ४३०

**मा.बंडु गायकवाड, मा.सौ.नंदा लोणकर, मा.श्रीमती अमृता बाबर यांचे दि. १७/६/२०२१ चे पत्र.**

शहर सुधारणा समिती विषय क्र. ४५ ठराव क्र. ४५ दि. १४/६/२०२१ पुणे महानगरपालिकेच्या मालकीच्या सदनिकांची त्यामधील प्रत्यक्ष राहणा–या पुर्नवसित नागरिकांना शिघ्रसिद्धगणक दरामधील बांधकाम दर + मोकळया जमिनीचे भाडे या एकूण रकमेनुसार विक्री करणेबाबतच्या प्रस्तावाबाबत ठराव क्र. ४४३ दि. १५/६/२०२१ रोजी स्थायी समितीमध्ये मान्य झाला असून सदर विषयाचा फेरविचार करुन दप्तरी दाखल करण्यात यावा.

### माहितीसाठी आलेले विषय

विषय क्र. ४३१

उप आयुक्त, परिमंडळ विभाग क्र. ४ यांच्या अखत्यारीतील दि. १६/५/२०२१ ते दि.३१/५/२०२१ पर्यंतची महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(ड) नुसार मा.अति.महा.आयुक्त(इ) यांचे विषयपत्रासोबत जोडल्याप्रमाणे संविदा करार व तद्नुषंगिक माहिती निदर्शनास आणणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(इ) यांचे जा.क्र. मआ/परि.क्र.४/२४३ दि.२१/६/२०२० चे पत्र.

### हिशोब तपासणी अहवाल

विषय क्र. ४३२

कर आकारणी व कर संकलन खात्याकडील पेठ एरंडवणे सन २०१८–१९ मधील आकारणी प्रकरणांची व तदनुषंगिक कागदपत्रांची तपासणी केली असता आढळुन आलेल्या आक्षेपार्ह व दोषास्पद बाबींबाबत मा.सह महा.आयुक्त (मुख्य लेखापरिक्षक) यांनी जा.क्र. मुलेप/७१० दि. १६/६/२०२१ ने पाठविलेला हिशोब तपासणी अहवाल क्र. १० सन २०२१–२०२२ चा विचारासाठी.

विषय क्र. ४३३

मा.उप आयुक्त(तांत्रिक) यांचे नियंत्रणाखालील परवाना व आकाशचिन्ह विभागाकडील सन २०१६=१७ ते २०१८–१९ अखेर वसूल केलेल्या परमिट शुल्क रकमांची, परमिट फी चे नोंदणीपुस्तक, चलने व तदनुषंगिक उपलब्ध कागदपत्रांद्वारे तपासणी केली असता आढळुन आलेल्या आक्षेपार्ह व दोषास्पद बाबींबाबत मा.सह महा.आयुक्त (मुख्य लेखापरिक्षक) यांनी जा.क्र. मुलेप/७७५ दि. २१/६/२०२१ ने पाठविलेला हिशोब तपासणी अहवाल क्र. ११ सन २०२१–२०२२ चा विचारासाठी.

### सर्वात कमी रक्कमेचे टेंडर्स

विषय क्र. ४३४

पाषाण रस्ता व पाषाण सुस रस्त्यावर सायकल ट्रॅक विकसित करणे व तदनुषंगिक कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.एस.ॲण्ड जे बिल्डकॉन प्रा.लि. यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.२,४५,७६,१०६/– पेक्षा १८.०५% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु. २,०१,४०,११८=८७ पर्यंत काम करुन घेणेस व त्यांचेबरोबर करार करणेस अधिक जी.एस.टी. र.रुपये २९,४९,१३२=७२ अधिक रॉयल्टी चार्जेस र.रु. ३,४५,४३४=९६ अधिक मटेरियल टेस्टिंग चार्जेस र.रुपये ३६,८०५/– पर्यंत विशेष भाववाढ सुत्रानुसार (स्टार रेट) फरक अदा करणेस/कपात करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(इ) यांचे जा.क्र. मआ/पथ/२३२ दि.१८/६/२०२१ चे पत्र.

विषय क्र. ४३५

नगररोड वडगावशेरी क्षेत्रिय कार्यालयांतर्गत खराडी येथील कोवीड केअर सेंटर येथील चहा नाष्टा व दोन वेळचे जेवण पुरविणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या १० टेंडर्सपैकी ठेकेदार मे.फुड एक्सप्रेस प्लस यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.९०,०४,८७५/- पेक्षा २२.००% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु. ५९,५२,३७५/- अधिक प्रचलित दराने येणारा जी.एस.टी. र.रुपये १०,७१,४२७=५० एकुण र.रु. ७०,२३,८०२=५० पर्यंत काम करुन घेणेस व त्यापोटी त्यांचेशी करारनामा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/परि.क्र.१/२३६ दि.१८/६/२०२१ चे पत्र.

विषय क्र. ४३६

नगर रस्ता रामवाडी भुयारी मार्ग येथे दुरुस्ती व तद्नुषंगिक कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.तिरुपती कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ८२,५४,७९६=१६ पेक्षा ०.९०% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.८१,८०,५०२=९९ पर्यंत काम करून घेणेस व त्यांचेबरोबर करार करणेस अधिक जी.एस.टी. र.रुपये ९,९०,५७५=५४ पर्यंत अधिक मटेरियल टेस्टिंग चार्जेस र.रुपये ५२,२५०/- अधिक रॉयल्टी चार्जेस र.रुपये ८,६४९=६० पर्यंत अधिक कामगार विमा र.रु. ४१,२७३/- पर्यंत अदा करणेस अधिक टेंडर अटीशर्तीनुसार विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा/कपात करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(इ) यांचे जा.क्र. मआ/मुअ(प्रकल्प)/२४९ दि. २२/६/२०२१ चे पत्र.

विषय क्र. ४३७

**पुणे महानगरपालिकेच्या कोविड - 19 च्या सर्व लसीकरण केंद्रासाठी संगणक संच ( संगणक ,प्रिंटर व युपीएस ) खरेदी करणे कामी GeM portal वर निविदा मागविण्यात असता आलेल्या एकूण 4 (चार) निविदाधारकांपैकी मे.यश कॉम्प्युटर सर्व्हिसेस,पुणे यांचेकडून सर्वात कमी दर प्राप्त झालेला असल्याने त्याचेकडून खालील कोष्टकानुसार रक्कम रुपये - 29,94,140/- ( अक्षरी रक्कम रुपये - एकोण्तीस लक्ष चौर्याण्णव हजार एकशे चाळीस मात्र ) ( सर्व करांसह ) पर्यंत खरेदी करणेस, त्याप्रमाणे त्यांचेशी करारनामा तसेच त्यापोटी बिल अदा करणेस मान्यता मिळणेबाबत** मा.अति.महा.आयुक्त(इ) यांचे जा.क्र. मआ/भांडार/२५० दि. २२/६/२०२१ चे पत्र.

| अ.क्र. | साहित्याचा तपशिल | संख्या | दर प्रती नग ( सर्व करांसह ) | एकूण रक्कम रुपये ( सर्व करांसह ) |
|---|---|---|---|---|
| 1 | संगणक | 46 नग | 48,000/- | 22,08,000/- |
| 2 | प्रिंटर | 46 नग | 14,990/- | 6,89,540/- |
| 3 | युपीएस | 46 नग | 2,100/- | 96,600/- |
| | | | **एकूण रक्कम रुपये** | **29,94,140/-** |

## मागील सभेचे विषय

विषय क्र. ४३८

अभियांत्रिकी महाविद्यालय पुणे यांचेकडून सार्वजनिक कामासाठी घेतलेले एकूण जागा ६९५५.६२७ चौ.मी. विना भरपाई दिलेली आहे. या बदल्यात पुणे महानगरपालिकेच्या मालकीचा प्लॉट नं.६६ क्षेत्रफळ २६१२.२९ चौ.मी. तेथील असणा-या सर्व झोपडयांसह संपूर्ण जागा झोपडपट्टी पुर्नवसन योजना करणेकरिता अभियांत्रिकी महाविद्यालय पुणे ( महाराष्ट्र शासनाची स्वायत्त संस्था) यांचेकडे हस्तांतरण करणेस मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा. महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/माव्य/९६४ दि.१५/१/२०२० चे पत्रावर झालेला मा.शहर सुधारणा समिती सभा ठराव क्र. ३१३ दि. १३/३/२०२० विचारासाठी.

(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि. २२/६/२०२१ च्या सभेत ठरले होते.)

शिवाजी दौंडकर
नगरसचिव,
पुणे महानगरपालिका.

(टिप :- प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची कागदपत्रे (डॉकेटस) नगरसचिव यांच्या कार्यालयात वाचण्यासाठी ठेवली आहेत.)

सुचना - कोरोना विषाणूमुळे उद्‌भवलेली परिस्थिती विचारात घेवून मे.केंद्र व राज्य शासनाच्या आदेशाचे तंतोतंत पालन करावे ही विनंती. व्हिडीओ कॉन्फरन्सींगची लिंक आपणास व्हॉट्सअॅप द्वारे कळविण्यात येईल.